
ePaper

# ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचं 82 व्या वर्षी निधन



| वर्ष - 6 । अंक - 221 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- वीजयंत्रणा सक्षमीकरणासाठी ४१ कोटींचा प्रकल्प
- लघुउद्योगांना राज्य सरकारचे "रेड कार्पेट"
- पीसीएमसीमधील गडबड-घोटाळा अन् भाजपाचा सो कॉल्ड गतिमान, पारदर्शी कारभार!


www.mahaenews.com | ।गुरुवार ।दिनांक 24 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# तयारी रणसंग्रामाची!

## प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध : चिंचवड सर्वाधिक मतदारांचा मतदारसंघ

**।पिंपरी-चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागात राबविलेल्या मतदार यादी अद्ययावतीकरण मोहिमेंतर्गत दुबार, मयत अशा सुमारे दोन लाख ८१ हजार ५८९ मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. जिल्हा निवडणूक शाखेकडून नुकतीच जिल्ह्याची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.**



पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदार संघात राबविलेल्या मतदार यादी अद्ययावतीकरण मोहिमेंतर्गत दुबार, मयत मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली आहेत. ते वगळून आता सर्वाधिक मतदार चिंचवड विधानसभा मतदारसंघात असून याठिकाणी पाच लाख १६ हजार ८३६ मतदार आहेत. त्यापाठोपाठ भोसरी मतदारसंघात ५,०५,८८५ तर सर्वांत कमी पिंपरी मतदारसंघात ३,५५,७५८ मतदार आहेत.

दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रारूप मतदार यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात येते. या मतदार यादीवर हरकती, सूचना मागविल्या जातात. त्यावर सुनावणी घेऊन ५ जानेवारीला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाते. या कार्यक्रमानुसार सध्या प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदार यादीत नाव नोंदणी, नाव, पत्त्यांमधील दुरुस्ती, एका मतदारसंघातून दुसऱ्या मतदारसंघात नाव नोंदविणे, मतदार यादीतील दुबार आणि मयत नावे वगळणे आदी कामे हाती घेतली जातात.

दरम्यान, जिल्ह्याची प्रारुप मतदार यादी ९ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. दावे व हरकती ८ डिसेंबरपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. दावे व हरकती स्वीकारण्याच्या कालावधीमध्ये राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निश्चित केलेल्या दोन शनिवार आणि रविवारी खास मोहिमा राबविण्यात येणार आहेत, तर २६ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी ५ जानेवारी २०२३ रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिली.

### मतदार यादीत नाव कसे तपासाल?

**मतदार यादीत नाव आहे किंवा कसे, हे HTTP://WWW.NVSP.IN या संकेतस्थळावर किंवा VOTERS HELPLINE या मोबाइल उपयोजनवर (ॲप) संपूर्ण नाव, वय, लिंग, राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ ही माहिती भरल्यानंतर समजेल. मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी अर्ज क्रमांक सहा भरावा, पत्ता बदलण्यासाठी आठ-अ, तर नाव वगळणीसाठी सात क्रमांकाचा अर्ज भरावा, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.**

# न्याय मिळेपर्यंत उपोषण ; कामगारांचा त्रागा

## कामगाराला मारहाण : कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**।पिंपरी-चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

कामगार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारुन युनियन केल्याचा राग आल्याने चाकण येथील एका कंपनीतील अधिकारी, कंत्राटदाराने मारहाण केल्याचा आरोप करत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी कामगार सकाळपासून उपोषणाला बसले आहेत. न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार कामगारांनी केला आहे.

पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व कामगार आज (बुधवार) पासून उपोषणला बसले आहेत. 100 हून अधिक कामगार या उपोषणात आहेत. हे कामगार चाकण, खराबवाडीतील थेट उत्पादन प्रक्रियेत काम करत असलेल्या एका कंपनीत काम करतात. राष्ट्रीय श्रमिक आघाडी या संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्याने कंपनीतील प्लांट हेड, एचआर, प्रोडक्शन मॅनेजर, डीसपॅच मॅनेजर आणि कंत्राटदाराने 'युनियनचा राजीनामा द्या, नाही तर आम्ही प्रत्येकाला मारु', 'पोलीस स्टेशन आमच्या ताब्यात आहे', 'आम्ही तुमच्या विरोधात खोट्या तक्रारी देवून तुम्हाला तुरुंगात डांबु' अशी धमकी दिल्याचा आरोप कामगारांनी केला.



राकेश कुमार ठाकूर या कामगाराला 10 ऑक्टोबर 2022 रोजी प्लांट हेडने केबिनमध्ये बोलावून घेतले. संघटना सोडण्यासाठी दबाव आणला, जीवे मारण्याची धमकी दिली. तर, ठेकेदाराने या कामगाराला मारहाण केल्याचा आरोप कामगारांनी केला. आम्हाला न्याय मिळावा, मारहाण करणा-या व जीवे मारण्याची धमकी देणा-या अधिकारी व ठेकेदारांविरोधात गुन्हा दाखल व्हावा. आम्हाला सेवेत कायम करुन कामावर घ्यावे, अशी मागणी कामगारांनी केली. आम्हाला जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही हटणार नाही. उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार या उपोषणाला बसलेल्या कामगारांनी केला.

### संघटना काढणे हा गुन्हा नाही : यशवंत भोसले

**राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे कामगार नेते यशवंत भोसले म्हणाले, संघटनेचे सभासदत्व स्वीकारने, आपल्या हक्कासाठी संघटना काढणे गुन्हा नाही. संघटना काढल्यामुळे कामगारांना मारहाण करणे अतिशय धक्कादायक आहे. याची तक्रारी देण्यास गेल्यास पोलिसांकडून ती दाखल करून घेतली गेली नाही. पोलिसांकडून कामगारांना न्याय मिळाला पाहिजे. या कामगारांना न्याय मिळावा, मारहाण करणा-या व जीवे मारण्याची धमकी देणा-या दोषी अधिकारी व ठेकेदाराविरोधात तत्काळ गुन्हा दाखल करावा. गेली दोन महिन्यापासून कामावर येण्यास मनाई केलेल्या कामगारांना सेवेत कायम करुन कामावर घ्यावे अशा मागण्यांसाठी कामगार बेमुदत उपोषणाला बसले आहेत. न्याय मिळेपर्यंत कामगार उपोषण करणार आहेत.**

# वीजयंत्रणा सक्षमीकरणासाठी 41 कोटींचा प्रकल्प

## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आश्वासन

**पुणे ।महाईन्यूज।**



उद्योगनगरीतील लघुउद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत औद्योगिक परिसरातील भुयारी गटार योजना, कचरा समस्या, अग्निशमन केंद्र, पीएमपीएमएल बस सुविधा आदी महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन बुधवारी मुंबईतील बैठकीत दिले. वीजपुरवठा सतत खंडित होण्याच्या नेहमीच्या समस्येवर तोडगा म्हणून वीजयंत्रणा सक्षमीकरणासाठी ४१ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक परिसरातील लघु उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांसदर्भात बुधवारी उद्योगमंत्र्यांच्या उपस्थितीत विधानभवनात बैठक झाली. आमदार महेश लांडगे, लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, उमेश लोंढे, विनोद नाणेकर, संजय सातव, प्रमोद राणे, विजय खळदकर, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, अतूल इनामदार या पदाधिकाऱ्यांसह पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, शहर अभियंता मकरंद निकम आदी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीतील चर्चेची माहिती संदीप बेलसरे यांनी दिली. उद्योगांवरील शास्तीकराबाबतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेवू, असे आश्वासन उद्योगमंत्र्यांनी दिले. संघटनेच्या कार्यालयासाठी 'एस-२ ब्लॉक'मध्ये राखीव असलेल्या भूखंड देण्यास मान्यता देण्यात आली. औद्योगिक पट्ट्यातील भूयारी गटार योजना व सी.इ.टी.पी. प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी आराखडा तयार करावा. या प्रकल्पाचा खर्च एमआयडीसी, महापालिका, एमपीसीबी आणि उद्योजक अशा तीन अस्थापनांकडून केला जाईल. भुयारी गटार योजनेबाबत पालिका प्रशासनाने चालढकल करु नये. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा, असे सामंत म्हणाले. औद्योगिक पट्ट्यात अखंडीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत मोशी, तळवडे आणि भोसरी येथे सब-स्टेशन उभारण्यात यावेत. यासाठी महावितरण प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. त्यासाठी आवश्यक मोकळ्या जागा हस्तांतरीत करण्यात येतील. जुन्या वीजयंत्रणांची दुरूस्ती दीड महिन्यांत पूर्ण करण्यात येईल. औद्योगिक पट्ट्यातील कचरा समस्या मार्गी लावण्याबाबत पालिका अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले. अग्निशमन केंद्र एक वर्षांत पूर्ण केले जाईल. अनधिकृत भंगार दुकानांवर कारवाई केली जाईल. एक खिडकी योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, वाहतूक समस्या आदी प्रमुख विषयांवर योग्य त्या कार्यवाहीचे आदेश मंत्र्यांनी बैठकीत दिले.

---

# पुणे विद्यापीठावर भाजपचेच वर्चस्व

## महाविकास आघाडीला एकच जागा

**पुणे ।महाईन्यूज।**



सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे अधिसभेच्या पदवीधर गटातील निवडणुकीत नऊ जागा मिळवत भारतीय जनता पक्षानेच वर्चस्व राखले. तर महाविकास आघाडी केवळ एकाच जागेवर विजय मिळवू शकली. यंदा पहिल्यांदाच राजकीय पक्षांनी उघडपणे या निवडणुकीत पॅनेल करून उमेदवार उतरवल्याने या निवडणुकीला राजकीय स्वरुप प्राप्त झाले. त्यात भाजपशी संबंधितांचा विद्यापीठ विकास मंच, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या महाविकास आघाडीचे सावित्रीबाई फुले पॅनेल, कॉंग्रेसने पाठिंबा दिलेले छत्रपती शाहू महाराज परिवर्तन पॅनेल, हिंदू महासभा आदी पक्ष-संघटनांचे एकूण ३७ उमेदवार १० जागांसाठी रिंगणात १० जागांसाठी होते. मंगळवारी रात्री उशीरा मतमोजणी संपली. भारतीय जनता पक्षाशी संबंधितांच्या विद्यापीठ विकास मंचाने दहापैकी नऊ जागांवर विजय मिळवला. त्यात खुल्या गटात प्रसेनजित फडणवीस, सागर वैद्य, युवराज नरवडे, दादाभाऊ भिकाजी शिनलकर, अनुसूचित जाती प्रवर्गातून राहुल पाखरे, भटक्या जाती प्रवर्गातून विजय सोनवणे, इतर मागास प्रवर्गातून सचिन गोरडे, अनुसूचित जमाती प्रवर्गातूनगणपत नांगरे, तर महिला प्रवर्गातून बागेश्री मंठाळकर यांनी विजय मिळवला. महाविकास आघाडीच्या सावित्रीबाई फुले प्रगती पॅनेलच्या बाकेराव बस्ते या एकमेव उमेदवाराने विजय मिळवला. खुल्या प्रवर्गातील दोन जागांसाठी काहीशी चुरस झाल्याचे दिसून आले.

---

# पुण्यात रिपब्लिकन गटात अस्वस्थता?

**पुणे। महाईन्यूज।**

भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांच्यातील युती, भाजपबरोबर मनसेची वाढत चाललेली सलगी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या रूपाने पुन्हा शिवशक्ती-भीमशक्तीची एकीकरणाची शक्यता अशा राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पुण्यात भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या (आरपीआय) आठवले गटामध्ये सध्या अस्वस्थता पसरली आहे.




गेली पाच वर्षे भाजपसोबत पुणे महापालिकेमध्ये सत्तेचा वाटेकरी राहिलेल्या 'आरपीआय'ला आगामी महापालिका निवडणुकांमध्ये जागा वाटपामध्ये मनसे आणि बाळासाहेबांची शिवसेना हे स्पर्धक राहण्याच्या शक्यतेने 'आरपीआय'ने उठावाची भूमिका घेतली आहे. आरपीआयने महापालिका निवडणुकीसाठी २० जागांचा आग्रह धरत आजवर राजकीय सोय म्हणून 'आरपीआय'कडे पाहणाऱ्या भाजपला आतापासूनच कोंडीत पकडण्यास सुरुवात केली आहे. 'आरपीआय'चे वेगवेगळे गट कोणत्या ना कोणत्या पक्षाच्या वळचळणीला आहेत. त्यापैकी आठवले गट हा गेली पाच वर्षे भाजपसोबत पुणे महापालिकेमध्ये सत्तेचा वाटेकरी होता.

---

# प्रशासनाकडून तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे प्रस्तावित

## अपघातांचा वेग सुसाट, उपाययोजना निकामी

**पिंपरी ।महाईन्यूज।**



कात्रज बोगदा ते नवले पूल या दरम्यान सातत्याने अपघात होत असल्याने या भागात चालू वर्षाच्या सुरुवातीला प्रशासनाकडून तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. त्यापैकी महामार्गावर सुरक्षा अडथळे, रम्बलर स्ट्रीप, वेग मर्यादा निश्चित करणे, सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे आदी उपाययोजना करण्यात आल्या. मात्र, अपघातांची मालिका अद्यापही कायम आहे. आता पुन्हा कात्रजच्या नवीन बोगद्यातून नवले पुलाकडे येतानाचा तीव्र उतार कमी करणे, स्वामी नारायण मंदिर ते दरीपूल मधील तीव्र वळण कमी करणे अशा उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. महामार्गावर कात्रज बोगदा ते नवले पूल या भागात सन २००० नंतर झपाट्याने नागरीकरण होत आहे. त्यामुळे एकेकाळी शहराबाहेर असणारा हा महामार्ग आता शहराचाच एक भाग झाला आहे. या भागात राहणाऱ्या नागरिकांकडून दररोज नोकरी, व्यवसाय, शिक्षणाच्या निमित्ताने हाच मार्ग वापरला जातो. दक्षिणेकडील अनेक राज्यांतील अवजड वाहने पुणे, मुंबईसह मोठ्या शहरात व तेथून अन्य राज्यांत जातात. कात्रज बोगदा ते नवले पूलापर्यंत तीव्र उतार असल्याने या परिसरात सातत्याने अपघात होत आहेत. या भागात यापूर्वी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. मात्र, नवले पुलाजवळ रविवारी रात्री आणि मंगळवारी देखील अपघात झाला.

दरम्यान, या भागात सातत्याने होणारे अपघात टाळण्याविषयी एका खासगी संस्थेने अभ्यास करून प्रशासनाला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार कार्यवाही देखील करण्यात आली. मात्र, तरीदेखील अपघात होत आहेत. त्यामुळे वेगळ्या प्रकारच्या उपाययोजना प्रशासनाकडून हाती घेण्यात येणार आहेत. त्यानुसार मुख्य उतार कमी करणे, स्वामी नारायण मंदिर ते दरीपूल मधील तीव्र वळण कमी करणे, विविध ठिकाणी रम्बलर स्ट्रीप व रिफ्लेक्टर बसविणे, जड वाहनांची वेगमर्यादा प्रतितास ४० कि.मी. करणे, रम्बलर स्ट्रीप दर ३००-४०० मीटरच्या अंतरावर बसविणे, स्पीड गन व कॅमेरे बोगद्यापासून थोड्या-थोड्या अंतरावर बसविणे, नागरिक महामार्गावर येणार नाहीत, या दृष्टीने नऱ्हे सेल्फी पॉइंट हटविणे, पायऱ्या तोडणे, महामार्गावरील सूचना फलक रस्त्याच्या मध्यभागी दर्शनी भागावर लावणे, अशा विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्तालयात प्रशासनाच्या एकत्रित बैठकीत ठरविण्यात आले आहे.

# लघुउद्योगांना राज्य सरकारचे “रेड कार्पेट”!

## मुंबईतील मॅरेथॉन बैठकीत प्रलंबित प्रश्नांना गती

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यातील लघुउद्योगांना शिंदे-फडणवीस सरकारकडून ‘रेड कार्पेट’ तयार केले जात असून, विविध प्रलंबित प्रश्नांना गती दिली आहे. त्यामध्ये औद्योगिक पट्ट्यातील भूयारी गटार योजना व सी.इ.टी.पी. प्लांट, खंडीत वीज पुरवठा, कचरा समस्या, अग्निशमन केंद्र, पीएमपीएमएल बस सुविधा यासह विविध समस्या मार्गी लावण्यात आल्या आहेत.**



मुंबईतील विधानभवन येथे राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत आज पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील लघुउद्योगांचे प्रतिनिधी आणि प्रमुख अधिकारी यांची महत्वपूर्ण बैठक झाली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, विनोद नाणेकर, संचालक संजय सातव, प्रमोद राणे, विजय खळदकर, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, उमेश लोंढे, अतूल इनामदार, महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, मुख्य शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह त्या-त्या विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या पुढाकाराने आणि आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली लघु उद्योजकांनी राज्य सरकारकडे विविध मागण्यांसाठी पाठपुरावा केला. त्याला राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, अशी माहिती अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी दिली.

संदीप बेलसरे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील लघुउद्योगांच्या विविध मागण्या आणि समस्यांबाबत उद्योगमंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदा असा उद्योग मंत्री आहे. ज्यांनी लघुउद्योजकांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्यावर अत्यंत जलदगतीने निर्णय घेतले. उद्योगांवरील शास्तीकराच्या बाबतीतही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेवू, असे आश्वासन उद्योगमंत्र्यांनी दिले आहे. विशेष म्हणजे, संघटनेच्या कार्यालयासाठी एस-२ ब्लॉकमध्ये राखीव असलेल्या भूखंड देण्याबाबत मान्यता देण्यात आली.

### बैठकीत झालेले निर्णय पुढीलप्रमाणे :

**औद्योगिक पट्ट्यातील भूयारी गटार योजना व सी.इ.टी.पी. प्लाँटसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आहे. याबाबत तात्काळ ‘डीपीआर’ तयार करावा, असे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. या प्रकल्पाचा खर्च एमआयडीसी, एमपीसीबी, महापालिका आणि उद्योजक अशा तीन अस्थापनांकडून केला जाईल. भूयारी गटार योजनेबाबत महापालिका प्रशासनाने चालढकल करु नये. त्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा. आवश्यकता भासल्यास राज्य सरकार निधी उपलब्ध करेल. औद्योगिक पट्ट्यात अखंडीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत मोशी, तळवडे आणि भोसरी येथे सब-स्टेशन उभारण्यात यावेत. यासह चार लहान सब-स्टेशन उभारण्याबाबत महावितरण प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. त्यासाठी आवश्यक मोकळ्या जागा हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, जुनी वीज यंत्रणा आहे त्याची देखभाल दुरूस्ती दीड महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी ४१ कोटी रुपयांचा ‘डीपीआर’ तयार करण्यात येत आहे. यासह औद्योगिक पट्ट्यातील कचरा समस्या मार्गी लावण्याबाबत महापालिका अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले. अग्निशमन केंद्र एक वर्षात पूर्ण करणार, वाहतूक व्यवस्था, अनधिकृत भंगार दुकानांवरील कारवाई, एक खिडकी योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आदी प्रमुख विषयांवर सकारात्मक निर्णय घेवून कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.**

---

# आम आदमी पार्टीचा खेडमध्ये “युवा संवाद”!

### आप युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष मयुर दौंडकर यांची माहिती

### खेड- आळंदी विधानसभा मतदार संघातील प्रश्नांवर होणार चर्चा

खेड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**खेड-आळंदी विधानसभा मतदार संघातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आम आदमी पार्टीच्या वतीने युवकांशी संवाद साधण्यात येणार आहे. त्यासाठी तालुक्यातील युवकांना आवाहन केले असून, “युवा संवाद” मेळाव्याद्वारे तालुक्यातील प्रमुख प्रश्न आणि उपाययोजना याबाबत विचारमंथन करण्याचा संकल्प केला आहे, अशी माहिती आप युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष मयुर दौंडकर यांनी दिली.**




आम आदमी युवा आघाडीच्या वतीने दि. ४ डिसेंबर २०२२ रोजी, मिरा मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता “युवा संवाद” मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्यासाठी तालुकाध्यक्ष मयुर दौंडकर यांनी पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष रंगा राचुरे, युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य शिंदे, राज्य संघटक संदीप सोनवणे, पुणे संयोजक मुकूंद किर्दत आदी उपस्थित राहणार आहेत.

मयूर दौंडकर म्हणाले की, खेड- आळंदी विधानसभा मतदार संघातील पायाभूत सोयी-सुविधा आणि प्रलंबित प्रकल्प याबाबत युवकांमध्ये अनेक प्रश्न आहेत. तालुक्यातील समस्या आणि त्यावर उपाययोजना याबाबत आम आदमी पार्टीकडून एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे, अशी आमची भूमिका आहे. त्याद्वारे प्रलंबित प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यात येत आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात युवकांचा सहभाग लक्षणीय असून, ‘आप’च्या माध्यमातून सकारात्मक दृष्टीने काम करणारी युवकांची फळी निर्माण करणे हा आमचा हेतू आहे.

### खेड-आळंदीसह जिल्ह्यातील युवकांची हजेरी...

**खेड- आळंदी विधानसभा मतदार संघांतर्गत आम आदमी पार्टीच्या पुढाकाराने प्रथमच “युवा संवाद”मेळावा होत आहे. या कार्यक्रमासाठी प्रदेशस्तरावरील दिग्गज नेत्यांची उपस्थिती आणि मार्गदर्शन मिळणार आहे. त्यामुळे खेड-आळंदीसह जिल्ह्यातील आपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने ‘युवा संवाद’ला उपस्थिती राहील, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी मिरा मंगल कार्यालय, मार्केट यार्ड चाकण येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे.**

**मयूर दौंडकर म्हणाले की, खेड- आळंदी विधानसभा मतदार संघातील पायाभूत सोयी-सुविधा आणि प्रलंबित प्रकल्प याबाबत युवकांमध्ये अनेक प्रश्न आहेत. तालुक्यातील समस्या आणि त्यावर उपाययोजना याबाबत आम आदमी पार्टीकडून एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे, अशी आमची भूमिका आहे. त्याद्वारे प्रलंबित प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यात येत आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात युवकांचा सहभाग लक्षणीय असून, ‘आप’च्या माध्यमातून सकारात्मक दृष्टीने काम करणारी युवकांची फळी निर्माण करणे हा आमचा हेतू आहे.**

# पीसीएमसीमधील गडबड-घोटाळा अन् भाजपाचा सो कॉल्ड गतिमान, पारदर्शी कारभार!



भाष्य

विक्रांत पाटील
8007006862

**काहीतरी गडबड-घोटाळा दिसतोय. शेखर सिंग हे सुरुवातीपासूनच PCMC आयुक्त पदात फारसे रमलेले दिसत नाहीत. त्यांच्यावर ही नियुक्ती लादली तर गेलेली नाही? म्हणजे आधीच्या उत्तम कार्य करणाऱ्या, शहर अतिक्रमणमुक्त करणाऱ्या, प्रशासन गतिमान व पारदर्शी करणाऱ्या आयुक्तांना राजाकारण्यांचे लाड व पर्सनल स्कोअर सेटल करण्यासाठी मुदत संपण्यापूर्वीच हलवायचे अन् नाराज करायचे; दुसरीकडे, इच्छा नसलेल्या व्यक्तीला त्या पदी आणून बसवायचे. नेमके साधायचे आहे तरी काय ही नस्ती उठाठेव करणाऱ्या मंडळींना? मुंबईत बसलेल्या निर्णयक्षम व्यक्तींना हे कळत नसावे का? फक्त आपल्या लोकप्रतिनिधींना खुश करून PCMC तील लाखो नागरिकांचे भले होणार आहे का?**

काय साधले जाईल अशातून? केवळ आपल्या पक्षाच्या लोकांची पर्सनल खुन्नस मिटावी म्हणून हे असे निर्णय भाजपश्रेष्ठी घेणार आहेत का? पिंपरी-चिंचवडच्या जनतेशी त्यांची काही बांधिलकी आहे की नाही? आधीच्या आयुक्तांनी शहरात आणि प्रशासनात सुधारणा केल्या की नाही, याचे उत्तर होकारार्थी आहे. मग लोकाभिमुख कार्य करणाऱ्या प्रामाणिक, जनहितदक्ष, कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची भाजप श्रेष्ठींना काही ॲलर्जी आहे का? PCMC तील पत्रकार सांगतात, आधीच्या आयुक्तांवर अजित पवारांचा शिक्का असल्याने प्रॉब्लेम झाला. मी अनेक लोकांशी, उद्योजक, सर्वसामान्य व प्रतिष्ठित नागरिकांशी बोललो. त्यांचे म्हणणे आहे, की ते "अजितदादांचा माणूस" नव्हे, तर "जनतेचा माणूस" होते. त्यांची जनतेशी बांधिलकी होती. उलट NCP वाल्यांनी त्यांच्या सर्वाधिक तक्रारी केल्या होत्या. मात्र, कारभार चांगला, स्वच्छ असल्याने अजित पवार ठामपणे सांगत होते, "कुणी चांगले काम करतोय तर करू द्या!" शहरासाठी, जनतेसाठी चांगले करण्याची करण्याची तळमळ अजित पवारांकडे होती, आहे. आजचा PCMC चा जो स्वच्छ, सुंदर, नियोजनपूर्वक अन् सुटसुटीत चेहरा दिसतोय, त्याचे यश या तळमळीचा भावनेला आहे. उगाचच फुकाच्या विकासगप्पा मारणाऱ्या भाजपाकडे ती तळमळ आहे की नाही? शेखर सिंग पुण्यात आल्यापासून महापालिका आयुक्त कार्यालयात कमी आणि पालिकेबाहेर ऑटो-क्लस्टरमध्येच जास्त बसतात. अधिकाऱ्यांनाही ते तिकडेच बोलावून घेतात, बैठकाही तिकडेच घेतात. ते राजकारण्यांना भेटायचे शक्यतोवर टाळतात. शेखर सिंगही चांगले अधिकारी आहेत. ते दबावाला बळी पडणार नाहीत. आधीच्या बाजूला काढून ठेवलेल्या चुकीच्या फायली ते ओके करणार नाहीत.शेखर सिंग कामावर कमी अन् सुटी, रजेवरच जास्त असतात. त्यांच्या सारख्या मुंबई चकरा सुरू असतात. कालही ते मुंबईत दिसले. त्यांना मुंबई किंवा दिल्लीत बहुतेक जायचे असेल. PCMC मधील दबावाखाली काम करायला त्यांची मानसिक तयारी नसेल. कुणाही स्वच्छ, प्रामाणिक अधिकाऱ्याची असणार नाही. मग आणून ठेवा भ्रष्ट अन् बरबटलेले अधिकारी, जे राजकारण्यांच्या तालावर नाचतील. PCMC तील जनतेच्या नशिबी कायम भ्रष्ट अधिकारीच राहणार का? इथे जनताभिमुख प्रशासन येणारच नाही का? भाजपाश्रेष्ठींना हे सारे चित्र बदलायची इच्छा आहे की नाही? जे काम PCMC मध्ये गेल्या 15-20 वर्षात झाले नव्हते ते झाले, शहराने मोकळा श्वास घेतला, सर्वसामान्य नागरिकांची कामे विना चिरी-मिरीने होऊ लागली, कामांचे, तक्रारींचे ऑनलाईन ट्रॅकिंग होऊ लागले... मग हे सारे करणारा अधिकारी का नकोसा झाला स्वच्छ कारभाराच्या बाता करणाऱ्या पक्षाला? आता ते हटवून, पालिका प्रशासनाचा कारभार ठप्प करून काय साधले गेले? WHAT NEXT? प्रशासन, कारभार ठप्प करून तुमचे लोकप्रतिनिधी आता सुखावले आहेत का? जनतेच्या गैरसोयी अन् खोळंबलेल्या कामांची जबाबदारी कोण घेणार? जनतेला उत्तर कोण देणार? जनतेप्रती काही उत्तरदायित्व आहे की नाही? आधीचे आयुक्त गेल्यापासून PCMC तील सर्व कामे, प्रशासन आहे तिथे ठप्प आहे. हाच का पारदर्शी अन् गतिमान कारभार? एखाद-दोन लोकप्रतिनिधींना खुश करायचे की लाखो पिंपरी-चिंचवडकरांना? हे भाजपाश्रेष्ठींना ठरवावे लागेल.



## संपादकीय »

### पोपटांची पैदास!

***त्यांची सरन्यायाधीशपदाची कारकीर्द जेमतेम ७४ दिवसांची. पण त्या काळात त्यांनी आपल्या कामाचा झपाटा दाखवून दिला. त्यांच्यानंतर धनंजय चंद्रचूड सरन्यायाधीश झाले.***

या दोघांनीही अलीकडेच दोन स्वतंत्र समारंभांत कनिष्ठ न्यायालयांविषयी व्यक्त केलेल्या भावनेत चांगलेच साम्य आढळते. विद्यमान सरन्यायाधीश आणि नुकतेच सरन्यायाधीशपदावरून पायउतार झालेले या दोघांच्याही भावना त्यांच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील यंत्रणेविषयी समांतर असतील तर त्यांची दखल घेणे आवश्यक. म्हणून सुरुवातीस उल्लेख केलेला मुद्दा निदान या न्यायाधीशांस तरी लागू होत नाही. यातील एक नुकतेच सेवानिवृत्त झालेले आणि दुसरे नुकतेच या सेवेच्या सर्वोच्च पदी आरूढ झालेले आहेत. या उभयतांस स्वत:च्या यंत्रणेतील या त्रुटी जाणवलेल्या असल्याने त्या दूर होण्याची आशा याबाबत बाळगणे अजिबात अनाठायी नाही. आता या दोघांनी व्यक्त केलेल्या मतांविषयी. उभयतांच्या या मतांची एकत्र दखल घेतल्याने या विषयाचे गांभीर्य अधोरेखित होण्यास मदत होते..

## ‘जैव-प्लास्टिक’ हे पारंपरिक प्लास्टिकला पर्याय ठरेल?

**प्लास्टिकचे दुष्परिणाम पुन्हापुन्हा सांगावे लागतातच, पण त्याला पर्याय म्हणून आलेले ‘जैव प्लास्टिक’ तरी मानव आणि पर्यावरणासाठी सुरक्षित आहे का?**

१९०७ साली लिओ बेकलँडने प्लास्टिकचा शोध लावला त्यानंतर अल्पावधीतच प्लॅस्टिकने संपूर्ण जग व्यापले आणि प्लास्टिक युग उदयास आले. ‘प्लास्टिकशिवाय जगणे नाही’ इतके या अविघटनशील पदार्थाने जनसामान्यांना आपलेसे केले. ‘एक वेळ वापरा आणि फेकून द्या’ याचा भयंकर परिणाम म्हणजे दरवर्षी साधारणतः ४०० दशलक्ष टन टाकाऊ प्लास्टिक जगभर निर्माण होते. १९५० पासून जगात तयार झालेल्या ९.१ अब्ज टन प्लास्टिकपैकी ६.९ अब्ज टन प्लास्टिक कचऱ्याच्या स्वरूपात आहे, केवळ ९ % प्लास्टिकचा पुर्नवापर झाला तर काही जमिनीच्या पुर्नभरणासाठी वापरले तर उर्वरित महासागरात साठत गेले. महासागरातल्या या प्लास्टिक ढिगाऱ्याचा विपरीत परिणाम अनेक जैव घटकावर होत आहे. जवळपास ८६ टक्के सागरी कासवे, ४४ टक्के समुद्री पक्षी आणि ४३ टक्के सागरी सस्तन जीवांवर प्लास्टिकचे दुष्परिणाम होत आहेत. त्याचबरोबर



अनेक प्रजाती नष्ट झाल्या आहेत आणि काही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तरंगणाऱ्या प्लास्टिकमुळे पाण्यात विरघळणाऱ्या ऑक्सिजनचे प्रमाण घटते आहे परिणामी, जलचर आणि एकूणच परिसंस्था धोक्यात आहे.

जमिनीत गाडले गेलेल्या प्लास्टिकचा परिणाम मातीचा पोत, मातीची गुणवत्ता, वनस्पतीच्या वाढीसाठी उपयुक्त असणारे जिवाणू, पाण्याचे स्रोत, प्रवाह व इतर नैसर्गिक घटकावर होत आहे. अंत्यत धोकादायक घटक म्हणजे मायक्रोप्लास्टिक! हवा, सूर्यप्रकाश आणि अन्य नैसर्गिक घटकामुळे प्लास्टिकचे रूपांतर प्लास्टिक कणात होते जे कण मातीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मावर परिणाम करतात. त्यामुळे, पिकउत्पादनात बऱ्याच अंशी घट होऊ शकते. दुसरे महत्वाचे म्हणजे हे कण सहजासहजी मातीपासून वेगळे करणे शक्य नसते. मातीत या कणांचे प्रमाण वाढत गेल्यास मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता, उबवण व उत्पादन क्षमता कमी होते आणि माती नापीक होण्याचा धोका वाढतो.

मायक्रोप्लास्टिक मानवी आरोग्यास फारच धोकादायक आहे. प्लास्टिकमधील अनेक रसायनांमुळे हार्मोन्सचे असंतुलन, प्रजनन समस्या होतेच त्याचबरोबर कर्करोग होण्याची शक्यता वाढते. मायक्रोप्लास्टिकमधून बाहेर पडणारी बिसफेनॉल व थॅलेट ही रसायने मानवाच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम करतात. पुरुषामध्ये थॅलेट हे संयुग रक्त प्रवाहात गेल्यावर टेस्टोस्टेरॉन हॉर्मोन्स निर्मितीवर परिणाम करते ज्यामुळे टेस्टोस्टेरॉनची पातळी घटते. अलीकडील अभ्यासाने हे सिद्ध केले आहे कि, जगभरात थॅलेटमुळे पुरुष प्रजनन क्षमता कमालीची घटली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥
\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### अक्कलकोटजवळ रस्ते अपघातात तिघांचा जागीच मृत्यू

। मुंबई । महाईन्यूज ।

कर्नाटकातील शहाबाद वाडी भागातून फरशी घेऊन सोलापूरच्या दिशेने येणाऱ्या मालमोटारीची आणि चारचाकी मोटारीची समोरासमोर धडक बसून घडलेल्या आपघातात मोटारचालक व चिमुकल्या मुलासह तिघाजणांचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

अपघातातील मृत व जखमींची ओळख पटली नाही. मात्र अपघातग्रस्त कर्नाटकातील विजापूर जिल्ह्याच्या इंडी तालुक्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. अक्कलकोट-गुलबर्गा महामार्गावर वागदरीच्या महाराष्ट्र सीमेच्या अलिकडे शिरवळ येथे हा अपघात झाला. कर्नाटकातील शहाबाद वाडी येथे मोठ्या प्रमाणावर फरशीचे उत्पादन होते. तेथून फरशीचा साठा घेऊन मालमोटार सोलापूरच्या दिशेने येत होती. तेव्हा अक्कलकोटहून चार चाकी मोटार गुलबर्ग्याच्या दिशेने जात होती.मात्र भारतात बेकायदा राहण्यासाठी अनेक जण अर्ज भरून नोंदणी करत नाहीत.

# कोणतेही गाव पाण्यावाचून इकडे-तिकडे जाण्याचा विचार करणार नाही!

## महाराष्ट्र-कर्नाटक वादावर मुख्यमंत्री शिंदेंचे आश्वासन

। मुंबई। महाईन्यूज ।



**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत गेले होते. साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी एकही गाव महाराष्ट्र जाणार नाही, ही जाबाबदारी आमची असल्याचे आश्वासन दिले. शिवाय, सांगलीतील बऱ्याचश्या गावांमध्ये त्यावेळी पाण्याची टंचाई होती. आता बऱ्याच योजना करत अनेक प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. त्यामुळे कोणतेही गाव पाण्यावाचून इकडे-तिकडे जाण्याचा विचार करणार नाही. एकही गाव महाराष्ट्राबाहेर जाणार नाही, याची जबाबदारी आमची आहे. त्यामुळे त्या भागातील काही प्रश्न आहेत, ते सोडवले असून, काही प्रलंबित आहेत तेही लवकरच सोडवले जातील.**

एकही गाव महाराष्ट्राबाहेर जाणार नाही. सांगलीतल काही गावांचे प्रश्न सोडवले तर, काही प्रश्न सोडवण्यावर काम सुरू आहे. त्यामुळे एकही गाव महाराष्ट्रातून बाहेर जाणार नाही. तसेच, कोणतेही गाव पाण्यावाचून इकडे-तिकडे जाण्याचा विचार करणार नाही, असे अश्वासन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगलीतील जत तालुका कर्नाटकात समाविष्ट करण्याचे सूतोवाच केलेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिर्डीत भाष्य केले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत गेले होते. साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी एकही गाव महाराष्ट्र जाणार नाही, ही जाबाबदारी आमची असल्याचे आश्वासन दिले. शिवाय, सांगलीतील बऱ्याचश्या गावांमध्ये त्यावेळी पाण्याची टंचाई होती. आता बऱ्याच योजना करत अनेक प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. त्यामुळे कोणतेही गाव पाण्यावाचून इकडे-तिकडे जाण्याचा विचार करणार नाही. एकही गाव महाराष्ट्राबाहेर जाणार नाही, याची जबाबदारी आमची आहे. त्यामुळे त्या भागातील काही प्रश्न आहेत, ते सोडवले असून, काही प्रलंबित आहेत तेही लवकरच सोडवले जातील.

कर्नाटक सरकारने महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यावर दावा केला आहे. याबाबत प्रश्न मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी ही 2012 सालची मागणी होती. तसेच, हे जूने प्रकरण असून, हा वाद सर्वोच्च न्यायलात प्रलंबित असून, आम्ही एकत्रितरित्या सोडवण्याची आमची भूमिका आहे. याबाबत राज्यपालांच्या बैठका झाल्या आहेत. तसेच, केंद्र सरकारही यामध्ये सकारात्मक भूमिका घेईल.

सांगली जिल्ह्याच्या जत तालुक्यातील ४० गावांवर दावा करण्याच्या तयारीत असलेल्या कर्नाटक सरकारमुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न पुन्हा एकदा पेटला आहे. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद पुन्हा एकदा उफाळून येणार आहे.

कर्नाटक सरकार महाराष्ट्रातील कन्नड-माध्यम शाळांना अनुदान देईल. शेजारी राहणाऱ्या कन्नडच्या स्वातंत्र्यसैनिकांना पेन्शनही उपलब्ध करून देईल, असंही बसवराज बोम्मई म्हणालेत.

# जिंकण्यासाठीच मैदानात उतरा; उद्धव ठाकरेंनी फुंकलं रणशिंग

।अमरावती। महाईन्यूज ।



**आगामी निवडणुकांकडे बघता एकमेकांशी समन्वय साधून काम करा असेही ठाकरेंनी म्हटले आहे. आपल्याला जिंकण्यासाठीच मैदानात उतरायचं आहे, असा विश्वासह यावेळी ठाकरेंनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला आहे. शिवसेना भवनात पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ठाकरेंनी वरील आदेश दिले आहेत.**

जिंकण्यासाठीच मैदानात उतरा असं आदेश देत उद्धव ठाकरेंनी आगामी काळातील निवडणुकांसाठी रणशिंग फुंकले आहेत. आगामी काळात होऊ घातलेल्या महापालिका आणि सिनेटच्या निवडणुका लक्षात घेता ठाकरेंनी पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना वरील आदेश दिले आहेत.

आगामी निवडणुकांकडे बघता एकमेकांशी समन्वय साधून काम करा असेही ठाकरेंनी म्हटले आहे. आपल्याला जिंकण्यासाठीच मैदानात उतरायचं आहे, असा विश्वासह यावेळी ठाकरेंनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला आहे. शिवसेना भवनात पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ठाकरेंनी वरील आदेश दिले आहेत.

सत्ता येतात जातात परंतु आपल्याला संघटना वाढीसाठी काम करावे लागणार आहे. सध्याच्या सरकारची त्यांच्या सोयीनुसार प्रभागाची रचना करून घेण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळेच या सरकारने पुन्हा नव्याने प्रभाग रचना करण्याचे आदेश दिल्याचे ठाकरेंनी म्हटले आहे. एकूणच काय तर, सध्याच्या सरकारचा मनमानी कारभार सुरु असल्याचेही ते म्हणाले.

# गुजरात निवडणुकीसाठी महाराष्ट्रात सुट्टी!

## अजित पवार शिंदे सरकारवर संतापले

। मुंबई । महाईन्यूज ।

### "सरकारबद्दल शेतकऱ्यांच्या मनात फार नाराजी"

**"यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून शिंदे सरकारवर टीका केली. या सरकारबद्दल शेतकऱ्यांच्या मनात फार मोठी नाराजी आहे. या सरकारने जलसमाधी घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊ देता कामा नये. आम्ही सरकारमध्ये असताना आंदोलनाची भूमिका कुणी मांडली तर त्यांच्याशी चर्चा करत होतो मात्र आताच्या सरकारला शेतकऱ्यांसोबत चर्चाच करायची नाही ही भूमिका लोकशाहीमध्ये, सरकारमध्ये ठेवणे हे अतिशय चुकीचे आहे त्यामुळे सरकारने त्यांना वेळ दिला पाहिजे", असे रोखठोक मत अजित पवार यांनी मांडले.**



गुजरात विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे, यासाठी राज्य सरकारने १ व ५ डिसेंबर रोजी पालघर, नाशिक, धुळे व नंदुरबार या चार जिल्ह्यांतील कर्मचाऱ्यांना पगारी सुट्टी जाहीर केली आहे. दरम्यान, या निर्णयावरून अजित पवार यांनी शिंदे सरकारवर जोरदार टीका केली. आम्हीही १५ वर्ष सत्तेत होते. त्यावेळी मध्यप्रदेश, गोव्यात निवडणुका झाल्या. मात्र, आम्ही कधी अशी पगारी सुट्टी दिली नाही, अशा प्रकारे नवीन पायंडा पाडणे चुकीचं आहे, असे ते म्हणाले.

आज मुंबईत झालेल्या पत्राकार परिषदेत ते बोलत होते. "शेजारच्या राज्यात निवडणुका आहेत म्हणून आपल्या राज्यातील काही जिल्ह्यांना सुट्टी देणं योग्य नाही. निवडणुका या दर पाच वर्षांनी येतात. यापूर्वी असं कधी घडल्याचे मला आठवत नाही. आम्हीही १५ वर्ष सत्तेत होतो. त्यावेळी मध्यप्रदेश, गोवा आणि कर्नाटकात निवडणुका झाल्या. मात्र, आम्ही कधी अशी पगारी सुट्टी दिली नाही, अशी प्रकारे नवीन पायंडा पाडणं चुकीचं आहे", अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. "आज ३६५ दिवसांपैकी सर्व प्रकारच्या सुट्ट्या पकडून जवळपास पावणे दोनशे सुट्ट्या दिल्या जातात. त्यामुळे याचा आपण कुठं गांभीर्याने विचार केला पाहिजे, राज्याचा गाडा हाकताना अधिकारी सहा महिने पगारी सुट्टी घेत असेल आणि उर्वरित सहा महिने काम करत असेल, तर हा जनतेचा टॅक्स रुपाने आलेला पैशांचा गैरवापर आहे", असेही ते म्हणाले.

दरम्यान, यावेळी त्यांनी भाजपा प्रवक्ते शुधांशू त्रिवेदी यांनी शिवरायांबाबत केलेल्या विधानावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. "शिंदे सरकार सत्तेत आल्यानंतर मंत्र्यांचे विविध प्रकारचे स्टेटमेंट सुरू आहेत. जी व्यक्तव्य अजितबात करण्याची गरज नाही. अशा प्रकारची वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण करण्याची प्रयत्न सुरू आहे. मी मध्यंतरी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटून या वाचाळवीरांना आवरा, असे सांगितले होते. आजपर्यंत कधी एवढ्या खालच्या पातळीवर जाऊन टीका होत नव्हती. मात्र, आता वरिष्ठ पदांवर बसलेल्या व्यक्तींनाही काय बोलावं याचं तारतम्य राहिलेलं नाही. प्रवक्तेपदावर असताना आपण काय बोललं पाहिजे, यांच भान ठेवलं पाहिजे, वरून ते प्रवक्ते म्हणतात, माझी काही चुकी नाही. एखाद्यावेळी चुकल्यानंतर आपण माफी मागतो. मात्र, आज तसे होताना दिसत नाही",

# रोजगार मेळाव्यांसाठी ‘डबल इंजिन’चा लाभ - मोदी!

## 71 हजारांहून अधिक तरुणांना नोकरीची नियुक्तिपत्रे दिल्याचे जाहीर

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मंगळवारी ७१ हजारांहून अधिक तरुणांना नोकरीची नियुक्तिपत्रे दिल्याचे जाहीर केले. “राष्ट्रीय लोकशाही आघाडीची (एनडीए) सत्ता असलेली राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत गेल्या एका महिन्यात अशाच प्रकारच्या मोहिमा घेण्यात आल्या. ‘डबल इंजिन’ सरकारचा (केंद्रात व राज्यात एकाच आघाडीचे सरकार) हा दुहेरी फायदा आहे. तरुणांना नियुक्तिपत्रे देण्याची मोहीम कायमस्वरूपी सुरू राहील,” असे मोदी यांनी मंगळवारी सांगितले. केंद्र सरकारने आयोजित केलेल्या दुसऱ्या रोजगार मेळाव्यास संबोधित करताना ते




बोलत होते.

हिमाचल प्रदेशात नुकत्याच पार पडलेल्या आणि गुजरातमधील आगामी विधानसभा निवडणुकीसह अनेक निवडणुकांत ‘डबल इंजिन सरकार’ हा भाजपने प्रचाराचा मुद्दा केला आहे. मोदींनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मंगळवारी एकूण ७१ हजार ५६ नियुक्तिपत्रे नवीन भरती झालेल्या युवकांना वितरित केली. निवडणूक आचारसंहिता लागू असलेल्या गुजरात व हिमाचल प्रदेश वगळता देशभरातील ४५ ठिकाणी नियुक्तीपत्रांच्या प्रत्यक्ष प्रती देण्यात आल्या. मोदी म्हणाले, की केवळ एका महिन्यात केंद्रशासित प्रदेश व ‘एनडीए’शासित राज्यांनी हजारो तरुणांना नियुक्तिपत्रे दिली आहेत. मोदी यांनी सांगितले, की गेल्या महिन्याभरात महाराष्ट्र व गुजरातने हजारो नियुक्तिपत्रे दिली आहेत. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेश सरकारनेही अनेक तरुणांना नियुक्तिपत्रे दिली. जम्मू-काश्मीर, लडाख, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, चंडीगड येथेही रोजगार मेळावे आयोजित केले आहेत आणि हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे. गोवा व त्रिपुराची सरकारेही अनुक्रमे २४ नोव्हेंबर आणि २८ नोव्हेंबर रोजी रोजगार मेळावा घेणार आहेत. सरकारने देशातील तरुणांना नोकऱ्या देण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली आहे. तरुण हे देशाचे सर्वात मोठे सामर्थ्य आहेत. त्यांच्या कलागुणांचा राष्ट्रउभारणीत उपयोग व्हावा यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

# गुजरातच्या राज समधियाला गावात निवडणुकीच्या प्रचारसभांना मनाई

## मतदान न केल्यास होते दंडात्मक कारवाई

। नवी दिल्ली।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



१९८३ सालापासून कोणत्याच पक्षाला या गावात प्रचारासाठी परवानगी दिली गेली नाहीय. आपण या गावात जाऊन प्रचार केला तर नियमभंग केल्याप्रकरणी येथील नागरिक आपल्याला मतदान करणार नाहीत, या भीतीने कोणताही राजकीय पक्ष वा निवडणुकीला उभा राहिलेला कोणताही उमेदवार येथे प्रचाराला जात नाही.

गुजरातमध्ये निवडणुकींच्या प्रचाराचा धडाका सुरू आहे. काँग्रेस, भाजपा आणि आपकडून जोरदार प्रचार सुरू आहे. गुजरात राज्याच्या विविध मतदारसंघात जाऊन स्थानिकांशी वैयक्तिक चर्चा सुरू आहे. अशातच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुजरातमधील एका गावात शांतता पसरली आहे. राजकोट जिल्ह्यातील राज समधियाला गावांत प्रचार फेऱ्या होत नाहीत. येथील नागरिकांनी या प्रचार फेऱ्या का होत नाहीत, याबाबत इनसाईड स्टोरी सांगितली आहे.

या गावातील लोकांनी कोणत्याही पक्षातील नेता, कार्यकर्त्यांना या गावात येण्यास, प्रचार करण्यास मनाई केली आहे. प्रचाराला मनाई असली तरीही येथील गावातील लोक मतदान जरुर करतात, जे करत नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते. निवडणूक प्रचारासाठी उमेदवारांना येथे प्रचार करण्यास परवानगी देणे त्या क्षेत्रासाठी हानिकारक आहे. त्यामुळे या गावात कोणत्याही पक्षाला प्रवेश आणि प्रचार करण्यास परवानगी नाही. राज समाधियाला गाव हे राजकोट जिल्ह्यात २० किलोमीटर अंतरावर आहे. येथे प्रचार सभांना मनाई असली तरीही मतदान करणे अनिवार्य केले आहे. मतदान न केल्यास संबंधित व्यक्तीला ५१ रुपयांचा दंड ठोठावण्यात येतो. ग्राम विकास समितीने गावातील लोकांसाठी हे नियम बनवले आहेत.

# : “राहुल गांधी सद्दाम हूसेनसारखे दिसत आहेत”

## भाजपाने उडवली खिल्ली

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी काँग्रेस नेते यांच्या ‘भारत जोडो’मधील लूकची खिल्ली उडवली आहे. राहुल गांधी सद्दाम हुसेन यांच्यासारखे दिसत असल्याचा टोला त्यांनी लगावला आहे. काँग्रेसने भाजपाच्या टीकेला उत्तर दिलं असून “जेव्हा तुमच्या नेत्याने (पंतप्रधान) दाढी वाढवली होती, तेव्हा आम्ही काही बोललो नव्हतो. आम्ही महत्त्वाच्या



मुद्द्यांवरच चर्चा करतो,” असं काँग्रेसने म्हटलं. अहमदाबादमधील प्रचारसभेत बोलताना हेमंत बिस्वा सरमा यांनी म्हटलं की “काही दिवसांपूर्वी टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत मी राहुल गांधी यांच्या दिसण्यावर मला काहीच समस्या नसल्याचं म्हटलं होतं.

### काँग्रेसने भाजपाला फटकारलं

**काँग्रेसच्या प्रवक्त्या अलका लांबा यांना भाजपाला फटकारलं आहे. “राहुल गांधी यांनी हेमंत बिस्वा सरमा यांच्यापेक्षा आपल्या निष्ठावंत श्वानाला जास्त महत्त्व दिलं हे बरं झालं,” असं त्यांनी म्हटलं आहे. काँग्रेसचे संदीप दीक्षित म्हणाले आहेत की “मला तर भाजपावर हसू येत आहे. भारत जोडो यात्रेला घाबरुन त्यांची पातळी इतकी खालावेल असं वाटलं नव्हतं. त्यांच्या नेत्यानेही (पंतप्रधान मोदी) दाढी वाढवली होती. पण आम्ही काहीच म्हटलं नव्हतं. आम्ही योग्य मुद्द्यावर बोलतो. पंतप्रधान आपल्याविरोधात कट आखला जात असल्याचं म्हणाले आहेत. कट बंद दाराआड आखले जात असतात, लाखो लोक सहभागी झालेल्या यात्रेत नाही”.**

# ३८ घोटाळेबाज फरार, थकीत कर्जात ३५० टक्के वाढ!

## केंद्र सरकारवर काँग्रेसचा आर्थिक गैरव्यवस्थापनाचा आरोप

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

केंद्रातील भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या (एनडीए) काळात ३८ बँक घोटाळेबाज देशाबाहेर पळून गेले असून थकीत कर्जामध्ये तब्बल ३५० टक्क्यांची वाढ झाली आहे. उद्योजकांची १० लाख कोटींची कर्जे माफ करण्यात आली असून त्यापैकी केवळ १३ टक्के कर्जे वसूल झाली आहेत, अशी आकडेवारी देत काँग्रेसने केंद्रावर आर्थिक गैरव्यवस्थापनाचा गंभीर आरोप केला.

गेल्या आठ वर्षांच्या काळात देशाची अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचा दावा करण्यात आला असून १० लाख रोजगार निर्माण केले जातील, असे आश्वासनही केंद्र सरकारकडून देण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी ७१ हजार युवक-युवतींना रोजगार नियुक्तीपत्र दिले. पहिल्या टप्प्यात ७५ हजार बेरोजगारांना नियुक्तीपत्र देण्यात आले होते. पंतप्रधान मोदींनी देशातील युवकांना रोजगाराची हमी दिली असताना,



काँग्रेसने मात्र केंद्राच्या आर्थिक धोरणावर टीका केली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारने बड्या उद्योजकांची १० लाख ९ हजार ५१० कोटींची कर्जे माफ केली आहेत. या कर्जमाफीचे मूल्य २०२२-२३ च्या राजकोषीय तुटीच्या ६१ टक्के इतके प्रचंड आहे. या कर्जापैकी केवळ १३ टक्के म्हणजे १ लाख ३२ हजार कोटींची वसुली करण्यात केंद्राला यश आले आहे. सार्वजनिक बँकांना कर्जात बुडवून ३८ कर्ज थकबाकीदार देशाबाहेर पळून गेले आहेत. या कर्जबुडव्यांना मायदेशात आणण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. थकीत कर्जाचा वाढता बोजा, आणि उद्योजकांची वाढती कर्जमाफी या दोन्ही मुद्द्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून भाजप निवडणुका लढवत असल्याची टीका काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी मंगळवारी केली. रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २०१४-१५ ते २०१९-२० या काळात १८.२८ लाख कोटी थकीत कर्जे होती, हे प्रमाण २००८-०९ ते २०१३-१४ या काळात फक्त ५ लाख कोटी इतके होते.

### कर्जबुडव्यांत बडे उद्योजक

**बड्या उद्योजकांनी थकवलेल्या कर्जाचे प्रमाण २३ हजार कोटींवरून २.४ लाख कोटींवर पोहोचले आहे. मेहुल चोक्सी, नीरव मोदी, विजय मल्ल्या या तीन बड्या कर्जबुडव्या उद्योजकांना मायदेशात आणण्यासाठी आत्तापर्यंत केंद्र सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. एकट्या चोक्सीला भारतात आणण्यासाठी केंद्राचे ४४ कोटी खर्च झाले आहेत, असा दावाही श्रीनेत यांनी पत्रकार परिषदेत केला.**

# "तिच्याशी लग्न करण्याशिवाय..." नागा चैतन्यने केला त्याच्या आणि समांथाच्या नात्याबद्दल मोठा खुलासा




दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा रूथ प्रभू आणि अभिनेता नागा चैतन्य यांच्या घटस्फोटाची बातमी ऐकून त्यांच्या चाहत्यांना चांगलाच धक्का बसला होता. आता या घटनेला बरेच दिवस उलटून गेले असले तरी या दोघांची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा असते. त्यांच्या घटस्फोटानंतर त्यांच्या नात्याबद्दलही बरंच काही बोललं गेलं पण तरी या दोघांनी एकमेकांबद्दल वाईट असं वक्तव्य केलं नाही. आज नागा चैतन्य त्याचा ३६ वा वाढदिवस साजरा करत आहे.

नुकतंच एका प्रेस मिटमध्ये मुलाखतीदरम्यान नागा चैतन्यने त्याच्या आणि समांथाच्या नात्याबद्दल खुलासा केला आहे. समांथाला प्रपोज करण्यासाठी नागा चैतन्यला किती मेहनत घ्यावी लागली याविषयी त्याने खुलासा केला आहे. याविषयी बोलताना चैतन्य म्हणाला, "तब्बल १० वर्षांपूर्वी मी आणि समांथा एका चित्रपटाच्या सेटवर भेटलो. त्यातली ७ वर्षं ही समांथाला इम्प्रेस करण्यातच गेली. माझ्याकडे तिच्याशी लग्न करण्याशिवाय काहीच पर्याय नव्हता." याविषयीच जेव्हा समांथाला विचारण्यात आलं होतं, तेव्हा मात्र तिने हसत खेळत मस्करीत उत्तर दिलं होतं की, "नागा चैतन्य हा बऱ्याच मुलींच्या मागे होता, माझा नंबर पुढे यायला त्याने ७ वर्षं घेतली होती." या दोघांच्या लग्नानंतरचे कित्येक किस्से आजही लोकांना ठाऊक आहेत. हे दोघे वेगळे झाल्याचं त्यांच्या चाहत्यांना पसंत पडलेलं नाही.

# 'थोडं प्रेम, थोडा...'; या दिवशी प्रदर्शित होणार रितेश-जिनिलियाच्या 'वेड'चा टीझर

बॉलिवूड अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जिनिलिया डिसुझा या जोडीची कायमच चर्चा होत असते. दोघांनी तुझे मेरी कसम या हिंदी चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, जिनिलिया डिसुझाने याआधी तेलगू, तमिळ, कन्नड चित्रपटांमध्ये काम केले आहे.




बॉलिवूडची ही लाडकी मराठमोळी जोडी आता मराठीत एका चित्रपटातून समोर येत आहे.

रितेशने नुकतंच त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवर त्याच्या आगामी 'वेड' या चित्रपटाचा फर्स्ट लूक शेअर केला होता. आता या चित्रपटाची एक मोठी बातमी समोर आली आहे. या चित्रपटाचा टीझर आपल्या भेटीस येणार आहे. रितेशने आपल्या फेसबुक अकाऊंटवर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली आहे. थोडं प्रेम, थोडा विरह आणि संपूर्ण वेडेपणाची गोष्ट. उद्या घेऊन येतोय एक झलक (टिझर) उद्या घेऊन येतोय एक झलक. उद्या दुपारी १२ ला या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित होणार आहे. असं त्याने पोस्टमध्ये सांगितलं आहे.

रितेश देशमुखने याआधी 'लई भारी', 'माउली' या मराठी चित्रपटात काम केले आहे.

# 'वाजले की बारा'नं अमृताचं नशीबच



सध्या अभिनेत्री अमृता खालविलकरची जोरदार हवा आहे. एकामागोमाग एक केलेले दर्जेदार प्रोजेक्ट आणि बॉलीवुडमधला वावर यामुळे ती प्रचंड चर्चेत आहे. 'चंद्रमुखी' या चित्रपटाने तिला वेगळीच ओळख मिळवून दिली. शिवाय 'हर हर महादेव' चित्रपटातूनही ती झळकली. विशेष म्हणजे हिंदीतील 'झलक दिखला जा' या डान्स शो मध्ये अमृताचा डान्स पाहून बॉलीवुडही तिच्यावर फिदा झाले. असे असले तरी तिचे 'वाजले की बारा' ही गाणे आपण कधीच विसरू शकणार नाही. आज अमृताचा वाढदिवस.. त्यानिमित्ताने जाणून घेऊन अमृता आणि वाजले की बाराचे खास कनेक्शन.. ज्याने तिचं नशीब चमकलं..

अमृता खानविलकरने तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने लाखो चाहत्यांच्या मनात घर केलं आहे. फक्त अभिनय आणि सौंदर्यच नाही, तर कोणत्याही प्रकारचं नृत्याचं प्रशिक्षण न घेता अमृताने तिच्या डान्सने प्रत्येकाला थक्क केलं आहे. तिच्या नृत्याची पहिली छाप रसिकांच्या मनावर पडली तर 'नटरंग' चित्रपटातील 'वाजले की बारा' या गाण्याने.. ही गाणे तिच्या करियरसाठी फार महत्वाचे ठरले. तुम्हाला धक्का बसेल पण या गाण्यासाठी अमृता खानविलकर ऐवजी दुसऱ्याच अभिनेत्रीची निवड करण्यात आली होती. रवी जाधव दिग्दर्शित 2010 मध्ये प्रदर्शित झालेला 'नटरंग' हा बहुचर्चित सिनेमा प्रत्येकाला आजही आठवत असेल. या चित्रपटाने अक्षरशः प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केलं. तमाशापट संकल्पनेवर आधारलेल्या या चित्रपटाची सुरुवात होते ते 'वाजले की बारा' या गाण्याने. आणि एक देखणी, रूपवान, पिवळी साडी-लाल चोळी नेसलेली, शृंगार केलेली आणि पायात घुंगरू बांधलेली तरुणी समोर येते.

# 'गोविंदा नाम मेरा' चित्रपटात 'या' मराठमोळ्या अभिनेत्याची भूमिका

बॉलिवूडमध्ये अनेक उत्तोमोत्तम चित्रपट प्रदर्शित होत आहेत. कोणताही नवीन चित्रपट प्रदर्शित होत असला की त्या चित्रपटातील स्टार कास्ट, गाणी यांची चर्चा नेहमीच होत असते. अशातच 'गोविंदा नाम मेरा' या हिंदी चित्रपटाचा नुकताच ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात बॉलिवूड मधील मोठे स्टार असूनही चर्चा मात्र एका मराठमोळ्या अभिनेत्याची होत आहे. 'गोविंदा नाम मेरा' या चित्रपटात अभिनेता विकी कौशल, अभिनेत्रीय कियारा अडवाणी आणि भूमी पेडणेकर अशी स्टार कास्ट आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. बॉलिवूड मधील आघाडीचे कलाकार या चित्रपटात असताना चर्चा मात्र मराठमोळा अभिनेता अमेय वाघ यांची होते आहे. 'झोम्बिवली' फेम अभिनेता अमेय वाघ 'गोविंदा नाम मेरा' या चित्रपटात विकी कौशलच्या मित्राच्या भूमिकेत झळकणार आहे.

# गौतम-श्रद्धा भगतची म्युझिकल लव्हस्टोरी

नव्याने प्रेमाची चाहूल लागलेल्या प्रेमवीरांची गोष्ट घेऊन 'फतवा' हा संगीतमय प्रेमपट 9 डिसेंबर 2022 ला प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे.

प्रेम हा आयुष्यातला त्याला आणि तिला जोडणारा रेशमी बंध असतो. हा बंध त्यांच्याही नकळत कधी जुळून येतो हे त्यांनाही कळत नाही. प्रत्येक प्रेमकथे मधला प्रेम हा समान धागा सोडला तर प्रत्येकाच्याच प्रेमाची एक वेगळी आणि खास गोष्ट आहे. प्रेम कोणी आणि कोणावर केलं यावर ते चूक की बरोबर? हे नाही ठरवता येत. नव्याने प्रेमाची चाहूल लागलेल्या प्रेमवीरांची गोष्ट घेऊन 'फतवा' हा संगीतमय प्रेमपट 9 डिसेंबर 2022 ला प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे.ब्ल्यु लाईन फिल्मस् प्रस्तुत आणि प्रतिक गौतम दिग्दर्शित या संगीतप्रधान चित्रपटातून प्रतिक गौतम आणि श्रद्धा भगत ही नवी जोडी रुपेरी पडद्यावर येत आहे. डॉ.यशवंत, प्रेमा निकाळजे, अनुराधा पवार यांनी या चित्रपटाची निर्मीती केली आहे.

नाट्यस्पर्धेत लहानपणापासून आपल्या अभिनयाची चुणूक दाखविणारा अभिनेता प्रतिक गौतम याने आजवर



एकांकिका, शॉर्टफिल्म यांचे लेखन, दिग्दर्शक व अभिनेता म्हणून काम केले आहे. त्याने दिग्दर्शित केलेल्या काहुर या लघुपटाला दिल्ली फिल्म फेस्टिवल- 2016 व जयपूर फिल्म फेस्टिवल- 2016 मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले आहे. ग्रामीण भागातल्या प्रतिकने मेहनतीने आपल्या इंजीनियरिंग चे शिक्षण पूर्ण केले. ग्रामीण भागातून येऊन स्ट्रगल करून, चित्रपट क्षेत्राशी काही संबंध नसलेला सामान्य कुटुंबातील पूर्णपणे 'नॉन फिल्मी बॅकग्राऊंड' असलेला प्रतिक एक बिगबजेट मुव्ही करतो अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून येऊन इथे उभा राहतो ही विशेष गोष्ट आहे.

# एकवीरा आईच्या दर्शनाला अभिनेत्री मयुरी वाघ आणि अमृता पवार

अभिनेत्री अमृता पवार ही 'आशीर्वाद तुझा एकवीरा आई' या मिलिकेत प्रमुख भूमिकेत असणार आहे. तर मयूरी वाघ ही यामध्ये एकवीरा आईच्या भूमिकेत दिसणार आहे.

सोनी मराठी वाहिनीवर 'आशीर्वाद तुझा एकवीरा आई' ही मालिका येत्या २८ नोव्हेंबरपासून सोम-शनि प्रसारीत होणार आहे. त्यानिमित्त या मालिकेतील कलावंतांनी कार्ला, लोणावळा येथे



स्थित एकवीरा मंदिरात जाऊन एकवीरा देवीचे दर्शन घेतले. यानंतर येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

या पत्रकार परिषदेत एकवीरा आईची भूमिका साकारणारी अभिनेत्री मयूरी वाघ, अभिनेत्री अमृता पवार, सोनी मराठीचे बिझनेस हेड अजय भाळवणकर आणि सोनी मराठी फिक्शन हेड सोहा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. या मालिकेचे शीर्षकगीत दिग्पाल लांजेकर यांनी लिहिले असून ते केवल वाळंज यानी गायले आहे. या प्रसंगी ते शीर्षक गीत केवलने उपस्थितांसमोर गायले.

विविध व्यक्तिरेखा साकारलेली अभिनेत्री अमृता पवार ही 'आशीर्वाद तुझा एकवीरा आई' या मिलिकेत प्रमुख भूमिकेत असणार आहे.

# मोरोक्कोने गतवेळच्या उपविजेत्या क्रोएशियाला दिली कडवी झुंज!

## सामन्यात एकही गोल होऊ शकला नाही, सामना बरोबरीत सुटला

**दोहा। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२२ मध्ये मोरोक्कोने शेवटच्या उपविजेत्या क्रोएशियाला कडवी झुंज दिली. दोघांमध्ये ही चुरशीची लढत होती. फिफाच्या जागतिक क्रमवारीत क्रोएशियाचा संघ १२व्या क्रमांकावर आहे. तर मोरक्कन संघ २२व्या क्रमांकावर आहे. फिफा विश्वचषक २०२२ मधील क्रोएशिया आणि मोरोक्को यांच्यातील सामना अनिर्णित राहिला. दोन्ही संघांनी गोल करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र एकाही संघाला यश मिळू शकले नाही. सामना अनिर्णित राहिल्याने क्रोएशियन संघाची चांगलीच निराशा होणार आहे. फिफा विश्वचषक २०१८ च्या अंतिम सामन्यात क्रोएशियाला फ्रान्सकडून ४-२ ने पराभव स्वीकारावा लागला.

उत्तरार्धात दोन्ही संघांनी असेच गोलचे प्रयत्न केले



### पूर्वार्धात एकाही संघाला गोल करता आला नाही

पूर्वार्धात क्रोएशिया आणि मोरोक्कोने शानदार खेळ केला, पण दोन्ही संघ गोल करू शकले नाहीत. क्रोएशिया संघाने बहुतांश वेळ चेंडू आपल्याकडेच ठेवला, मात्र गोल करण्यात संघाला यश मिळाले नाही. मोरोक्कोने पाच आणि क्रोएशियाने एक प्रयत्न केला. क्रोएशियाच्या लुका मॉड्रिचने अनेक चांगल्या चाली केल्या, पण तो मोरोक्कनच्या बचावफळीला भेदता आला नाही. सामन्याचा उत्तरार्धाला सुरुवात होताच पासलिकने ४८व्या मिनिटालाच क्रोएशियासाठी गोल केला. पण संघाचे नशीब खराब असल्याने तो ऑफसाईड गोल घोषित करण्यात आला. अशा प्रकारे सामना पुन्हा ०-० असा बरोबरीत राहिला. पहिल्या हाफपेक्षा दुसऱ्या हाफचा खेळ अधिक रोमांचक झाला. दोन्ही संघांनी झटपट गोल करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही.

या सामन्यात क्रोएशियाचा संघ सुरुवातीपासूनच दबाव निर्माण करताना दिसला.पण मोरोक्कन संघाच्या बचावपटूंनी त्यांना एकही संधी दिली नाही. मात्र, मोरक्कन संघालाही गोल करता आला नाही. पूर्वार्धात एकही ऑफसाइड गोल झाला नाही. या हाफमध्ये पासची अचूकता असो वा ताबा असो, प्रत्येक बाबतीत क्रोएशिया संघाचे पारडे जड दिसले. सर्वाधिक ३०९ पास क्रोएशियाकडे राहिले. तर मोरोक्कोकडे २१६ होते. पहिल्या हाफमध्ये फक्त एकदाच लक्ष्य गाठले गेले, म्हणजे गोल करण्याचा प्रयत्न झाला. क्रोएशियाच्या बाजूनेही हा गोळीबार करण्यात आला. पण मोरोक्कोने क्रोएशियाला गोल करण्यात यश मिळू दिले नाही. पहिल्या हाफमध्ये क्रोएशियाने ७ तर मोरोक्कोने ६ फाऊल केले.

सामन्याच्या ८०व्या मिनिटापर्यंत कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. मोरोक्कन संघाने क्रोएशियाचे आक्रमण पूर्णपणे बरोबरीत ठेवले.

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी पुणे शहर संघाची निवड चाचणी शनिवारपासून

## स्व. दामोदर टकले यांच्या स्मरणात स्पर्धेचे आयोजन

**पुणे । महाईन्यूज**



भारतीय कुस्ती महासंघातर्फे नेमलेल्या अस्थायी समितीच्या मान्यतेने संस्कृती प्रतिष्ठान व माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ६५ व्या वरिष्ठ गट (गादी व माती) राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन छत्रपती शिवाजी स्टेडियम, मंगळवार पेठ येथे २६ व २७ नोव्हेंबर २०२२ रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय तालीम संघाचे सरचिटणीस शिवाजीराव बुचडे यांनी दिली.

ही निवड चाचणी स्पर्धा राष्ट्रीय तालीम संघाचे विश्वस्त - अध्यक्ष स्व. वस्ताद दामोदर लक्ष्मण टकले यांच्या स्मरणार्थ घेण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धा आयोजक अविनाश टकले यांनी दिली. ही निवड चाचणी गादी आणि माती या दोन्ही विभागात होणार असून माती विभागात ५७ किलो, ६१ किलो, ६५ किलो, ७० किलो, ७४ किलो, ७९ किलो, ८६ किलो, ९२ किलो, ९७ किलो, ८६ किलो ते १२५ (महाराष्ट्र केसरी गट) किलो वजनी गटांमध्ये, तर गादी विभागात ५७ किलो, ६१ किलो, ६५ किलो, ७० किलो, ७४ किलो, ७९ किलो, ८६ किलो, ९२ किलो, ९७ किलो व ८६ किलो ते १२५ किलो (महाराष्ट्र केसरी गट) अशा वजनी गटात ही निवड चाचणी होणार आहे. या निवड चाचणीमध्ये केवळ पुणे शहरातील खेळाडूंचा समावेश राहणार आहे.

२६ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ ते १२ या वेळेत खेळाडूंची वजने केली जाणार असून दुपारी ४ पासून निवड चाचणी स्पर्धेला सुरुवात होणार आहे. निवड चाचणीमध्ये सहभागी होण्यासाठी मल्लांनी ३ फोटो, आधारकार्डची मुळ प्रत व झेरॉक्स घेवून येणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी गणेश दांगट, मधुकर फडतरे, जयसिंगअण्णा पवार, योगेश पवार, ज्ञानेश्वर मांगडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन राष्ट्रीय तालीम संघाचे सरचिटणीस शिवाजीराव बुचडे यांनी केले आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही